

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे

# श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, पुणे ४११ ००९

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न

Accredited by NAAC 'A' Grade (4th Cycle)

Website - www.shahucollegepune.org

मराठी विभाग

आयोजित

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र (ऑनलाईन)

## राजर्षी शाहू महाराज आणि मराठी साहित्य

शनिवार, दि. ७ मार्च २०२६

**आयोजक**

मराठी विभाग, श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे - ४११ ००९

☎ : ०२०-२४२२१४२४, ०२०-२४२२२००६

E-mail : principal_ssmmpune@yahoo.in • principalssmmpune9@gmail.com

आपले स्नेहांकीत,

| डॉ. विलास पाटील | प्रा. डॉ. दीपक गायकवाड | प्रा. वर्षा पाटोळे |
|---|---|---|
| प्राचार्य | संयोजक व मराठी विभागप्रमुख | सह समन्वयक |
| | (९०४९०९७०३७) | (९०२८६५७६०१) |



**पुणे शहराविषयी** पुणे शहर हे सांस्कृतिक व विद्येचे माहेर घर म्हणून भारतभर ओळखले जाते. प्रगत तंत्रविज्ञानाचे शहर म्हणूनही अलीकडच्या काळात पुण्याची नवीन ओळख निर्माण झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा लालमहाल, महादजी शिंदे वाडा, महात्मा फुल्यांचा वाडा, आगाखान पॅलेस, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा अहिल्याश्रम, पर्वतीच्या परिसरातील तळजाई टेकडी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यामुळे पुण्याचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आहे.

**संस्थेविषयी** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना तत्कालिन थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक यांच्या दूरगामी विचारांतून सन १९०७ मध्ये धारवाड (कर्नाटक) येथे झाली. संस्थेने २००७ साली शताब्दी महोत्सव साजरा केला. आर्थिक, सामाजिक, राजकीय, समता व न्यायावर आधारित समाजरचना निर्माण व्हावी, समाजातील दुर्बल घटकांची उन्नती व्हावी म्हणून महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सर्व आयुष्य पणाला लावले. या थोर महापुरुषांच्या विचार व कार्याचा आदर्श समोर ठेवून संस्थेची वाटचाल सुरु आहे. संस्थेच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण, शरद पवार, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, केशवराव जेधे, बाबूराव जेधे, पंजाबराव देशमुख, बाबूराव घोलप, वि.द. घाटे, अजित पवार, उत्तमराव उर्फ अण्णासाहेब पाटील यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. या थोर नेत्यांच्या विचार आणि कार्याने प्रेरित होऊन संस्थेने आपले कार्य चालविले आहे. ग्रामीण भागातील, तसेच समाजातील उपेक्षित घटकांमधील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे ध्येय समोर ठेवून, ते साध्य करण्यासाठी झटणारे व शिक्षणाबद्दल आस्था असणारे संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ही संस्थेची वैशिष्ट्ये आहेत. ६७ एकरांचा विशाल निसर्गरम्य परिसर लाभलेली संस्था कला, वाणिज्य व विज्ञान तंत्रज्ञानाच्या दिशेने यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

**महाविद्यालयाविषयी** श्री शाहू मंदिर महाविद्यालय हे स्थापनेपासूनच महाराष्ट्रातील एक अग्रगण्य महाविद्यालय राहिले असून ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायमस्वरूपी संलग्न आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते या महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीचा पायाभरणी समारंभ १९६० मध्ये संपन्न झाला. बंगलुरू येथील 'राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद' या संस्थेच्या समितीने महाविद्यालयास भेट देऊन मूल्यांकन केलेले आहे. श्री शाहू मंदिर महाविद्यालय हे गेली पन्नास वर्षे समाजातील सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे व त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे मोलाचे कार्य करीत आहे, ही बाब लक्षात घेऊन राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेने (NAAC) महाविद्यालयाला सलग तीन वेळा 'अ' दर्जा दिला आहे. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वानुसार महाविद्यालय वाटचाल करीत आहे. एनसीसी, एनएसएस, बहिःशाल शिक्षण मंडळ, विद्यार्थी विकास मंडळ, यांसारख्या पुणे विद्यापीठाशी संलग्न अशा विविध योजना महाविद्यालयात राबविण्यात येतात. त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी होतो.

**मराठी विभाग** मराठी विभागाने आतापर्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. या विभागात आजपर्यंत अनेक तज्ज्ञ, कला व साहित्यक्षेत्रात नावाजलेल्या लोकप्रिय व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आलेली आहेत. डॉ. आनंद यादव, डॉ. अशोक कामत, डॉ. वीणा देव, डॉ. शोभा इंगवले, डॉ. माधवी खरात आदी साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात नावाजलेली मंडळी मराठी विभागात अध्यापनाचे काम करीत होत्या. आजही ही परंपरा चालू आहे. इ. ११ वी ते एमएपर्यंत वर्ग चालतात. मराठी वाङ्मय मंडळ, भित्तीपत्रक यांसारख्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त उपक्रमशील योजना राबवल्या जातात. मराठीतील नामवंत लेखक, अभ्यासक, विचारवंत, तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी विभागात वेळोवेळी आमंत्रित केले जाते. विविध विषयांवरील चर्चासत्रे, व्याख्यानमाला आणि इतर वाङ्मयीन उपक्रम मराठी विभागामार्फत राबविले जातात.

## चर्चासत्राविषयी

महाविद्यालयात सातत्यपूर्ण महत्त्वाच्या विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन केले जाते. संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना आवश्यक असणारे विषय चर्चिले जातात. यावर्षी राजर्षी शाहू महाराज आणि मराठी साहित्य या महत्त्वपूर्ण विषयावर हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. सदर चर्चासत्रामध्ये अभ्यासक व संशोधकांनी सहभाग घेऊन आपला अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर करावा.

## शोधनिबंधाचे उपविषय

**राजर्षी शाहू महाराज आणि मराठी साहित्य**

१. शाहू महाराज आणि मराठी कादंबरी
२. शाहू महाराज आणि मराठी कविता
३. शाहू महाराज आणि मराठी नाटक
४. शाहू महाराज आणि मराठी कथा
५. शाहू महाराज आणि मराठी समीक्षा
६. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणांचा मराठी साहित्यावर प्रभाव
७. शाहू महाराज आणि मराठीतील चरित्र वाङ्मय
८. शाहू महाराज आणि मराठी वैचारिक साहित्य
९. शाहू महाराज आणि मराठी साहित्य
१०. शाहू महाराज यांच्या काळातील मराठी साहित्य
११. शाहू महाराज यांची भाषणे, पत्रे
१२. शाहू महाराज आणि दलित साहित्य चळवळ
१३. शाहू महाराज,सामाजिक न्यायाची संकल्पना आणि मराठी साहित्य
१४. फुले-शाहू-आंबेडकर त्रयी आणि मराठी साहित्य
१५. शाहू महाराज आणि मराठी चित्रपट, नाटक
१६. शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार आणि त्याचा साहित्यावरील प्रभाव

या चर्चासत्रातील आपला सहभाग निश्चितच मोलाचा ठरणार आहे. आपण, आपल्या महाविद्यालयातील संबंधित विषयांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांना शोधनिबंध पाठवण्यास सूचित करावे.

## नोंदणी शुल्क

**नोंदणी शुल्क व बँक खात्याचा तपशील :**

सहभाग आणि शोधनिबंध प्रकाशन - ११,००/-

संशोधक विद्यार्थी - रु. ९००/- फी भरण्यासाठी QR Code स्कॅन करावा.

---

WhatsAPP

**शोधनिबंध तपशील -**

मराठी शोधनिबंध : युनिकोड या फॉन्टमध्ये. (शब्दमर्यादा-१५००)

इंग्रजी शोधनिबंध : टाइम्स न्यू रोमन फॉन्टमध्ये. (शब्दमर्यादा-१५००)

शोधनिबंधाची एक ओपन व एक पीडीएफ अशा दोन फाईल्स इमेलवर पाठवाव्यात.

शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पिअर रिव्ह्यू (High Impact Factor) जर्नलमध्ये प्रकाशित केले जातील.

जर्नलची हार्ड कॉपी आणि प्रमाणपत्र पाठवले जाईल, याची नोंद घ्यावी.

**शोधनिबंध पाठवण्याचा अंतिम दिनांक : दिनांक २० फेब्रुवारी २०२६.**

**इमेल : hodmarathism2025@gmail.com**

## कार्यक्रम पत्रिका

शनिवार,०७ मार्च २०२६ **उद्घाटन:** वेळ १०.३० ते १२

**उद्घाटक व प्रमुख पाहुणे** : **मा. श्रीमंत छत्रपती मालोजीराजे,** कोल्हापूर
(ऑनररी सेक्रेटरी, ऑल इंडिया मेमोरिअल सोसायटी, पुणे)

**बीजभाषण** : **डॉ. अशोक राणा** (ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक व इतिहासकार)

**अध्यक्ष** : **मा. सौ. प्रमिलाताई गायकवाड** (सरचिटणीस अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

**सत्र पहिले :१२ ते १ – विषय : राजर्षी शाहू महाराज आणि मराठी साहित्य**

**साधन व्यक्ती** : **प्रा. डॉ. नामदेव गपाटे**
(समीक्षक, सा. प्राध्यापक, बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी, उत्तर प्रदेश)

**अध्यक्ष :** **प्रा. डॉ. नंदकुमार मोरे**
(समीक्षक, प्राध्यापक : मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

**सत्र दुसरे (खुले) : १ ते २ – निबंधवाचन**

: **प्रा. सोनी सिदु झोरो** (कला व वाणिज्य महाविद्यालय, कुंकळ्ळी – गोवा)

**अध्यक्ष** : **प्रा. डॉ. वेदश्री थिगळे** (प्राचार्य, एस. आर. पी. व्ही. नाईट कॉलेज, नाशिक)

**समारोप समारंभ :२ ते ३**

**प्रमुख पाहुणे** : **प्रा. डॉ. संदीप सांगळे** (अध्यक्ष : मराठी अभ्यास मंडळ,सा.फु. पुणे विद्यापीठ)

**अध्यक्ष** : **प्रा. डॉ. विलास पाटील** (प्राचार्य, श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे)

## आमचे प्रेरणास्थान

**मा. श्री. शरदरावजी पवार**
(अध्यक्ष, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

**मा. श्री. अजितदादा पवार** **मा. श्री. संजय शेटे**
(उपाध्यक्ष, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

**मा. सौ. प्रमिलाताई गायकवाड**
(सरचिटणीस, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

**मा. श्री. अजय पाटील** **मा. वासंती बोर्डे**
(संयुक्त चिटणीस, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

**मा. ॲड. भगवानराव साळुंखे** **मा. श्री. धैर्यशील वंडेकर**
(खजिनदार, अ.भा.म.शि.परिषद, पुणे)

## संयोजन समिती

**प्राचार्य डॉ. विलास पाटील**
(अध्यक्ष)

**प्रा. डॉ. प्रवीण जाधव**
(IQAC, समन्वयक)
**प्रा. डॉ. सुदाम शेळके**
**डॉ. गौरी कुलकर्णी**
**प्रा. डॉ. गणेश मधे**

**डॉ. दीपक गायकवाड**
(संयोजक व मराठी विभागप्रमुख)
**प्रा. नयनिका वाघमारे**
**प्रा. महेंद्र कांबळे**
**डॉ. जयसिंग बाबर**
**प्रा. वर्षा पाटोळे**
(सह – समन्वयक)

**प्रा. डॉ. रमेश देसाई**
(कला शाखा प्रमुख)
**प्रा. डॉ. मीना ठाकूर**
**प्रा. डॉ. वैशाली पवार**
**डॉ. प्रियांका नायकवाडी** (ग्रंथपाल )
**श्री. संजय शिंदे**
(कार्यालय अधीक्षक)